**बृहन्मुंबईबाहेर बदली झाल्यानंतर शासकीय निवासस्थानातील अनधिकृत वास्तव्यास आळा घालण्याकरीता करावयाची उपाययोजना**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक GAD-42011/1/2026-GAD(DESK-23A)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ ऑगस्ट, २०२६

**वाचा :-** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.सेनिवे २०१२/प्र.क्र.८९/सेवा-४, दि.१६ फेब्रुवारी, २०१३
२) शासन निर्णय, क्र.शानिवा १५१८/प्र.क्र.४६१/२३-अ, दि.०७ जानेवारी, २०२१
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.सेनिवे २०२६/प्र.क्र.३५/सेवा-४, दि.०३ जून, २०२६

**<u>शासन निर्णय</u>**

मंत्रालयीन विभागांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांमधील कर्मचाऱ्यांची बदली बृहन्मुंबईमध्ये झाल्यावर त्यांना शासकीय निवासस्थानाचे वाटप त्यांच्या मागणीनुसार करण्यात येते. तथापि, हे कर्मचारी बृहन्मुंबई बाहेर बदली झाल्यावर शासकीय निवासस्थानाचा ताबा सोडत नाहीत. तसेच, या कर्मचाऱ्यांची बदली झाली असल्याचे या विभागास किंवा सार्वजनिक बांधकाम विभागास अवगत नसल्यामुळे त्यांच्याबाबत कार्यवाही करणे शक्य होत नाही. अशा कर्मचाऱ्यांबाबत शासन पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्याचा निर्णय घेत आहे-

अ) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिनस्त मुंबई/मुंबई उपनगर असलेल्या क्षेत्रिय कार्यालयांतील ज्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून शासकीय निवासस्थानाच्या वापरापोटी अनुज्ञाप्ती शुल्क व सेवा शुल्क कपात होत आहे, अश्या कर्मचाऱ्यांची मुंबई बाहेर बदली झाल्यास त्यांचे आदेश या कार्यासनास चिन्हांकित करण्यात यावेत.

ब) तसेच, संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्याने शासकीय निवासस्थान रिक्त केल्याबाबतचे प्रमाणपत्र या विभागाकडून (सामान्य प्रशासन विभाग) प्राप्त करून घ्यावे आणि हे प्रमाणपत्र त्याचे अंतिम वेतन प्रमाणपत्र देतांना सोबत जोडून बदली झालेल्या कार्यालयास पाठवणे बंधनकारक राहील.

क) या विभागाकडून प्रमाणपत्र जोपर्यंत प्राप्त होत नाही तोपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यास नवीन कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून घरभाडे भत्ता आणि बदली झाल्यानंतर मिळणारा “प्रवास भत्ता” देण्यात येऊ नये.

ड) याचे पालन न करता जर एखाद्या कर्मचाऱ्यास घरभाडे भत्ता व प्रवास खर्च दिल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याची वसूली संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून करण्यात यावी.

इ) ज्या कर्मचाऱ्यांची मुंबईमध्ये बदली झालेली आहे तथापि, त्यांनी शासकीय निवासस्थान स्विकारलेले नाही अशा कर्मचाऱ्यांची बदली मुंबईबाहेर झाल्यावर ते शासकीय निवासस्थानाचा लाभ घेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी देणे बंधनकारक राहील.

३. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारितील बृहन्मुंबईतील शासकीय निवासस्थानांसाठी तसेच राज्यातील इतर सर्व शासकीय निवासस्थानांसाठी लागू राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१४१५२७२९७४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

SANGEETA AJIT SHINDE

Digitally signed by SANGEETA AJIT SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=BA607066E7A34E428B7C7C73DE0F7E09A315A2AF5075FD47F1E08389AA137B81, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DDF4C16E4A3043BBAA409E4ECF901CA0490CE93C66913DE88A7769927FF5E261, cn=SANGEETA AJIT SHINDE
Date: 2026.08.14 15:28:43 +05'30'

**( संगीता अ. शिंदे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. सर्व सन्माननीय संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
३. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६. मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८. मा. उप सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
९. मा. विरोधी पक्षनेता ( विधान सभा) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
१०. मा. विरोधी पक्षनेता ( विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
११. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१३. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१४. महाप्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
१५. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१६. प्रबंधक, अपिलेट शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१७. पोलिस, महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८. पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई
१९. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२०. सर्व मंत्रालयीन विभाग आणि त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालये
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२२. सर्व कार्यकारी अभियंता/उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
२३. निवडनस्ती